**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.**

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/JLN/135/2008/56/ Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Circle, M.S.E.D.C.L.,**
**JALNA.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Amit Surendra Shah, House No.86, Mhada Colony, Old Jalna, Dist.JALNA (Consumer No.510030379363)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Shri Amit Surendra Shah,House No.86, Mhada Colony, Old Jalna, Dist.JALNA

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 14.10.2008 at 12.00 Hrs.**

**Encl As above**.

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL,Aurangabad.**

**Copy to:-**
Shri Amit Surendra Shah,
House No.86, Mhada Colony,
Old Jalna,
Dist.JALNA

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/१३५/२००८/५६**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- १०/११/२००८**

**श्री अमित सुरेन्द्र शहा,**
**घर नं.८६ म्हाडा कॉलनी ,**
**जुना जालना.**
**(ग्राहक क्र.५१००३०३७९३६३) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०९/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतल्यानंतर पहील्या वीस दिवसात ९७४० यूनिट वीज वापर झाल्याचे मीटर दर्शवित होते. त्यांनी याबाबत संबंधीत विभागाकडे तक्रार केल्यानंतर त्यांच्या इते (**Parallel**) मध्ये समांतर मीटर लावण्यात आले. व या मीटर वरील नोंदीवरून जुने मीटर फॉल्टी असल्याचे सिध्द झाले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार पुढील सहा महीन्याचे वीज बिल त्यांनी मीटरवरील नांदीप्रमाणे आले.पण त्यानंतर जुन्या मीटरवरील ९७४० युनिट वापराची थकबाकी वीज बिलात दाखवितण्यात आली. हे चुकीचे वीज बिल न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. याबाबत अनेकदा केलेल्या तक्रारीची दखल महावितरण कंपनीने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल तसेच या पोटी खंडीत करण्यात आलेला वीज पुरवठा पर्नजोडणी करण्याबाबत अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती मंचास केली आहे.

२) अर्जदाराने अंतरिम आदेश पारीत करून वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्याबाबत केलेल्या अर्जावर दिनांक २५/०९/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जदार श्री अमीत शहा तसेच नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराचे वीज बिल रिव्हीजन उच्च अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असल्याचे सांगितले. मंचाने अर्जदाराने दाखल केलेल्या कागद पत्राची, सी.पी.एल.ची पाहणी केल्यावर अर्जदास नविन वीज पुरवठा केल्यानंतर पहील्या महिन्यातच ९७४० युनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले असल्याचे आढळुन आले त्याचप्रमाणे अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांनी देखील मान्य केल्यामुळे मंचाने अर्जदाराचा वीज पुरवठा २४ तासाच्या आत कोणतीही रक्कम न स्विकारता जोडुन द्यावा असा अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणी २१/१०/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) २१/१०/२००८ रोजी अर्जदार उपस्थित होते नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री खडके उपस्थित होते अर्जदाराचे घर बंद असल्यामुळे वीज पुरवठा जोडण्यात आला नसल्याचे त्यांनी मंचासमोर सांगितले. मंचाने अर्जदार व नोडल अधिकारी यांनी वेळेबाबत समनव्य साधुन २२/१०/२००८ पुर्वी वीज पुरवठा पुर्नजोडणी करण्याबाबत आदेश दिला व नोडल अधिकारी यांना बिल रिव्हीजन व इतर कागदपत्रे मंचात दाखल करण्याचे आदेश देवुन पुढील सुनावणी ०४/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले

४) दिनांक ०४/११/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी सुनावणीस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी बिल रिव्हीजन तसेच इतर कागद पत्रे मंचात दाखल केली व अर्जदाराचा वीज पुरवठा पुर्नजोडणी करून देण्यात आल्याचे सांगितले. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी राखुन ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरून व सी.पी.एल. वरून मंचास असे आढळुन येते की, महावितरण कंपनीने अर्जदारास घरगुती वापरासाठी दिनांक ०८/०७/२००३ रोजी वीज पुरवठा केला व पहील्या महीन्यातच मीटरवर ९७२१ ही रिडींग आल्यामुळे अर्जदारास त्याप्रमाणे बिल आकारणी करण्यात आली उपकार्यकारी अभियंता शहर उपविभाग जालना यांनी स्थळ पाहणी करून मीटर फॉल्टी असल्याचे म्हटले आहे. व ३४ दिवसांत ग्राहकाचा नोंदविण्यात आलेला ९७७५ युनिट वीज वापर चुकीचा असल्याचे म्हटले आहे. अर्जदाराचे हे फॉल्टी मीटर बदलुन त्याजागी नविन मीटर बसविण्यात आले. पण अर्जदारास देण्यात येणा-या वीज बिलात दुरूस्ती करून देण्यात आली नसल्याचे आढळुन येते. या चुकीच्या वीज बिलापोटी कोणतीही पुर्वसुचना न देता अर्जदाराचा वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याचे आढळुन येते. अर्जदाराने केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचे स्पष्ट होते.अर्जदाराने मंचात तक्रार दाखल केल्यानंतर वरीष्ठ अधिकारी यांच्याकडुन बिल रिव्हीजनची मान्यता मिळाली नसल्यामुळे अर्जदारास सुधारीत वीज बिल देण्यात आले नसल्याचे

नोडल अधिकारी यांनी मंचास सांगितले उपकार्यकारी अभियंता, जालना उपविभाग यांचा अहवाल तसेच नोडल आधिकारी यांनी मंचात दाखल केलेला जवाबावरून अर्जदाराचा या प्रकरणात कोणताच दोष नसल्याचे दिसुन येते व बिल रिव्हीजन प्रलबित असल्याचे कारण सांगुन अर्जदारास गेले ४ ते ५ वर्ष विजेपासुन वंचीत ठेवले असल्याचे दिसुन येते. महावितरण कंपनी ने अर्जदारास सेवा देण्यात केलेली अक्षम्य दिरगांई व प्रचंड उदासिनता यातुन दिसुन येते.

वरील सर्व निरीक्षणावरून मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने मंचात दाखल केलेले बिल रिव्हीजन योग्य असल्याचे मंचाचे मत आहे व त्याप्रमाणे सुधारीत वीज बिल अर्जदारास देण्यास मंच मान्यता देत आहे.

२) अर्जदारास देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड लावु नये.

३) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देतांना अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

४) महावितरण कंपनीने अर्जदारास आर्थीक व मानसीक नुकसानपोटी रूपये ५००/- तीस दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३५/२००८/५६** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री अमित सुरेन्द्र शहा,**
**घर नं.८६ म्हाडा कॉलनी ,**
**जुना जालना.**
**(ग्राहक क्र.५१००३०३७९३६३)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१३५/२००८/५६ )

आपण दिनांक २५/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ,जालना.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Circle, M.S.E.D.C.L.,**
**JALNA.**

**(Case No: CGRF/AZ/JLN/135/2008/56 )**

Sub:- Consumer letter dt.02.01.09
Ref: Forum's order dt.10.11.08

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the letter received form Shri Amit Surendra Shah regarding issue of incorrect bill .

**Please note that Forum has already passed an order in this case. However for any clarification you may attend Forums's office on 6.1.09 at 11-00 hrs.**